## ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २२/०६/२००९

## ठाणे महानगरपालिकेच्या खंडीत सर्वसाधारण सभेचे परिपत्रक

प्रति,
**सन्मा.श्री./श्रीमती------------------------------**
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या पत्राद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, सभा सूचना क्रमांक २, दि.१०/०६/२००९ अन्वये शनिवार दि.२०/०६/२००९ रोजी बोलाविण्यांत आलेली सभा खंडीत झाल्याने सदरहू सभा **मंगळवार दि.२३/०६/२००९ रोजी सकाळी ठिक ११.०० वा.ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न" डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात** बोलाविण्यांत येत आहे.

सदर सभेत सभा सूचना क्रमांक २, दिनांक १०/०६/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचारविनिमय करण्यांत येईल.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा.महापौर महोदया यांचे मंजूरीने.....**

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- २२/०६/२००९.

**(प्र.म.निंबर्गी)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# **ठाणे महानगरपालिका, ठाणे**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : १०.०६.२००९

**ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्रमांक २, दिनांक १०.०६.२००९**

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती-----------------------
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक २०.०६.२००९** रोजी **सकाळी ठिक ११.३० वाजता ठाणे महानगरपालिकेच्या "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात " सभा सूचना क्रमांक २ , दिनांक १०.०६.२००९** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा.महापौर महोदया यांचे मंजुरीने.................**

**(प्र.म.निंबर्गी)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**सभा सूचना क्र. २, दि.१०.०६.२००९ ची विषयपत्रिका**

**प्रश्नोत्तरे**

| **प्रकरण क्रमांक** | **विषय** |
|---|---|
| २ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० अन्वये खालील पाच विशेष समित्यांवर प्रत्येकी नऊ सदस्यांची संख्याबळानुसार नेमणूक करणे.<br>१) महिला व बाल कल्याण समिती<br>२) क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती<br>३) माध्य.व पूर्व प्राथमिक शिक्षण समिती<br>४) आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती<br>५) गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ३ | ठाणे महानगरपालिकेच्या दि.१९.१.०९, दि.१९.१.०९, दि.३.२.०९, दि.४.२.०९, दि.५.२.०९ व दि.१०.२.०९ रोजीच्या सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत. |
| ४ | श्री.एल.आर.गुप्ता, अतिरिक्त आयुक्त यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत. (दि.१६.२.०९ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण क्रमांक ३१९) |

.....२/-

| | |
|---|---|
| ५ | श्री.अरविंद आकाशी, सहा.आयुक्त यांची ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सहा.आयुक्त या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत. |
| ६ | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम करणेबाबत. (दि.१६.२.०९ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण क्रमांक ३२७) |
| ७ | महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१ए.ए.ए.) अन्वये फेरबदलाची सूचना विकास नियंत्रण नियमावली १९९४ ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र.६५ व ६८ या विनियमातील फेरबदल (प्रस्तावित) (दि.१६.२.०९ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण क्रमांक ३१३) |
| ८ | मौजे कोपरी येथील ठा.म.पा.शाळा क्र.३० खालील, सि.स.नं.१८१६ ची जागा, मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने भुखंड मालक यांचेशी समझोता करुन ताब्यात घेणेबाबत. |
| ९ | ठाणे महापालिका कार्यक्षेत्रात असलेल्या खेळाच्या मैदानासंदर्भात प्रभागनिहाय कार्यवाही करणेबाबत निश्चित धोरण ठरविणे. |
| १० | प्र.क्र.५० मधील किरपालबाग राजपार्क व ललित सोसा.समोरील मोकळया जागेत रस्त्यालगत उद्यान (नाना-नानी) पार्क विकसित करणेकरीता येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| ११ | मंजुर विकास योजना ठाणे से.क्र.८ खारीगांव येथील नियोजित ३० मी. दोन व २५ मी.एका रस्त्याची रुंदी कमी करणेचा फेरबदलाचा प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे पाठविण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| १२ | मासुंदा तलावासमोरील महात्मा गांधी उद्यानामधील जागा महापालिकेच्या पाळणाघराकरीता उपलब्ध करुन देणेबाबत. |
| १३ | राष्ट्रीय हिवताप निर्मुलन योजना महाराष्ट्र शासनाकडून डासांमार्फत पसरणा-या हिवताप व इतर रोगांच्या नियंत्रणांसाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सदरचा कायदा लागू होणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| १४ | ठाणे महानगरपालिकेची उपहारगृहे महिला बचतगटांना चालविणेस देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| १५ | ठाणे महानगरपालिका ॲथलेटीक्स प्रशिक्षण योजना प्रशिक्षकांचे मानधन वाढविण्यास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| १६ | जकात अनुसूचीतील अनुक्रमांक १९ चे दरांमध्ये बदल करणेबाबत मा.स्थायी समितीची शिफारस. |
| १७ | ठाणे महापालिका क्षेत्रातील जेष्ठ नागरीकांना आरोग्य विमा संरक्षण देणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक निर्णयासाठी सादर. |

| | |
|---|---|
| १८ | ठाणे महानगरपालिकेच्या स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर तरण तलावाचे शुल्क दर निश्चित करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची अंतिम मान्यता मिळणेबाबत. |
| १९ | हाजुरी येथील उर्दू शाळेजवळील मल्टीपर्पज हॉल तळ + १ मजला इमारत भाडे तत्वावर देणेबाबत ठराव क्र.१७७ दि.२७.८.०८ फेर विचारार्थ सादर. |
| २० | ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील भटक्या कुत्र्यांच्या शस्त्रक्रिया सामाजिक संस्थेकडून करुन घेणेस येणा-या प्रशासकीय व वित्तीय खर्चास मान्यता मिळणेबाबत. (दि.१८.१०.२००८ रोजीच्या सभेतील तहकुब प्रकरण क्रमांक १८२) |
| २१ | घोडबंदर रस्त्याचे दुतर्फा ९.० मी.रुंदीचा सेवा रस्ता बनविण्याबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| २२ | प्रभाग क्र.२३ मध्ये शिवाजीनगर (बाळकुम) येथे नाना-नानी पार्क बांधणेकरीता येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| २३ | प्र.क्र.५० मधील चिनार सोसायटी लगतच्या रस्त्याच्या प्रवेशद्वारास "ठाणे महानगरपालिका पारसिक नगर गेट नं.२" असे नामकरण करणेबाबत. |
| २४ | प्र.क्र.५० मधील आशा सोसायटी लगतच्या रस्त्याच्या प्रवेशद्वारास "ठाणे महानगरपालिका पारसिक नगर गेट नं.३" असे नामकरण करणेबाबत. |
| २५ | प्र.क्र.८८ मध्ये भुवनेश्वर मंदिर संतमिरा सोसायटीजवळ बांधण्यात आलेल्या पाणपोईस "जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै.दादा ठाकूरदास टेकचंद कुरसिजा " असे नामकरण करणेबाबत. |
| २६ | सुप्रसिध्द संगीतकार श्री.ओ.पी.नय्यर यांचे स्मृतीचिन्ह घाणेकर उद्यानामध्ये स्थापन करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी फेरसादर. |

**(प्र.म.निंबर्गी)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : १०.०६.२००९